POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-०९ ● मुंबई, शनिवार, ९ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## आर.एम.सी प्लांट बंदचे आदेश, तरीही कॉँक्रीटचा पुरवठा सुरूच



**■मिरारोड । प्रतिनिधी,**
बंदी असूनही मिरारोड शहरात सिमेंट प्रकल्प (आरएमसी प्लांट) सुरूच आहेत. शुक्रवारी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रामभवन शर्मा यांनी एका आरएमसी प्लांटमधील एक सिमेंट मिक्सर वाहन पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला. सिमेंट कॉँक्रीटच्या आरएमसी प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण होत आहे. या कारखान्यातून दररोज अवजड वाहने, मिक्सर तसेच वाळूची वाहने ये-जा करत असतात. प्रकल्पांकडून पर्यावरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेच नियम पाळले जात नाहीत. तसेच प्रदूषण रोखण्याची कोणतीच यंत्रणा नसल्याने या कारखान्यातून सतत धुळीचे प्रदूषण होत असते. या वाढत्या धूळ आणि प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ता ढासळून नागरी आरोग्यावरही याचा मोठा परिणाम होत असतो.

**बंदी डावलून प्लांट सुरू**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने १ ऑगस्ट रोजी शहरातील तीन आर.एम.सी प्लांट बंद करण्याचे आदेश काढले होते. मात्र हे आदेश धुडकावून शहरात बेकायदेशीरपणे प्लांट सुरू आहेत. शुक्रवारी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रामभवन शर्मा यांनी एका आरएमसी प्लांटमधील एक सिमेंट मिक्सर वाहन पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला.काशिगाव पोलिसांनी या सिमेंट मिक्सरच्या चालकाला ताब्यात घेतले आहे.याबाबत पोलिसांकडून तक्रार नोंद करण्याकरिता महापालिकेच्या अधिकार्यांशी संपर्क करण्यात आला.मात्र सुट्टी असल्याने कोणताही प्रतिसाद मिळालेला नव्हता. शुक्रवार संध्याकाळी उशीरापर्यंत याप्रकरणी गुन्हा दाखल नव्हता.

**आदेश काय?**

मिरा- भाईंदर महानगरपालिकेच्या उपायुक्त कल्पिता पिंपळे यांनी शहरातील तीन आर.एम.सी प्लांट बंद करण्याचा आदेश जारी केला आहे.यामध्ये कॉँक्रीट इंडिया,के.के.जी. आर.एम.सी,स्पेको इन्फ्रास्ट्रक्चर,अशा तीन आर.एम.सी. प्लांटची नावे आहेत.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी आर.एम.सी प्लांट संदर्भात अधिसूचना प्रसिद्ध करून परवानगीसाठी काही निकष,अटी व शर्ती दिल्या आहेत.यामध्ये आर.एम.सी प्लांटच्या २०० मीटरच्या अंतरात परिघात शाळा,महाविद्यालय किंवा मा. न्यायालय नसावे असे नमूद आहे.मात्र हे सर्व आर.एम.सी.प्लांट २०० मीटर आत शाळा येत असल्याने अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.त्या अनुषंगाने महापालिकेने परवानगीची मुदत संपुष्टात आल्यानंतर नूतनीकरणासाठी पुन्हा परवानगी दिली नाही व आर.एम.सी.प्लांट बंद करण्याचा आदेश देण्यात आले.




## महाराष्ट्रातील १५१ पर्यटक उत्तराखंडमध्ये अडकले



**■उत्तरकाशी । प्रतिनिधी,**
उत्तराखंडमधील उत्तरकाशी परिसरात ढगफुटी झाल्यामुळे पूर आला. सततचा मुसळधार पाऊस आणि पूर यामुळे नद्यांचे पाणी आणि चिखल गावातील असंख्य घरात शिरले. अनेक घरांची वाताहत झाली. चारधामपैकी एक असणाऱ्या गंगोत्रीजवळ कायमच पर्यटकांची गर्दी असते. याच भागात नैसर्गिक आपत्तीचा मोठा तडाखा बसला. उत्तरकाशीत आता सैन्याच्या आणि एनडीआरएफच्या मदतीने मदतकार्य वेगाने सुरू आहे.

उत्तराखंडमध्ये पर्यटन आणि चारधाम यात्रेच्या निमित्ताने अनेक राज्यांतून पर्यटक येत असतात. ढगफुटी झाली त्यावेळीही लाखो पर्यटक राज्यात होते. उत्तरकाशीत ढगफुटीमुळे अनेक पर्यटक संकटात सापडले. सतत ठिकठिकाणी जमीन खचत असल्यामुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सर्व जण मिळेल त्या वाटेने सुरक्षित ठिकाण गाठण्याचा आणि शक्य तितक्या लवकर घरी परतण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकारी आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील किमान १५१ पर्यटक ढगफुटीनंतर उत्तराखंडमध्ये अडकले. यापैकी १२० जणांशी संपर्क झाला आहे. इतरांचा शोध सुरू आहे.

ढगफुटीनंतर उत्तरकाशीत अनेक ठिकाणी मोबाईल नेटवर्क विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी विजेचा पुरवठा खंडीत झाला आहे. रस्ते वाहून गेले आहेत किंवा खचले आहेत. सततच्या पावसामुळे आणि पुरामुळे अनेकांशी संपर्क करणे कठीण झाले आहे. या प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. संपर्क न होऊ शकलेल्यांना शोधण्यासाठी हवाई पाहणी तसेच इतर आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे.

## एकनाथ शिंदे आणि आदित्य ठाकरेंचे कार्यकर्ते आमनेसामने; वरळी कोळीवाड्यात नेमकं काय घडलं




**■मुंबई । प्रतिनिधी,**
नारळी पौर्णिमेनिमित्त मुंबईतील वरळी कोळीवाडा येथे आज सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. कोळीवाड्याच्या गल्ल्या रंगीबेरंगी सजावट, झेंड्यांची लहर आणि पारंपारिक कोळी वाद्यांचा आवाजा घुमत आहे. नारळी पौर्णिमा सणात सहभागी होण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना ठाकरे गटाचे युवा आमदार आदित्य ठाकरे यांनीही वरळी कोळीवाड्यात हजेरी लावल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र याचवेळी दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते आमनेसामने आल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. वरळी मतदारसंघ हा आदित्य ठाकरे यांचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र नारळी पौर्णिमेनिमित्त याच बालेकिल्ल्यात एकनाथ शिंदे हजेरी लावत कोळीबांधवांना शुभेच्छा दिल्या. यानंतर आदित्य ठाकरेही वरळी कोळीवाड्यात पोहचले. दोन्ही नेत्यांचं स्वागत ढोल ताशाच्या गजरात करण्यात आलं. एकनाथ शिंदे आणि आदित्य ठाकरे कोळीवाड्यात येणार असल्याने त्या ठिकाणी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. समुद्राच्या पाया पडल्यानंतर एकनाथ शिंदे माघारी फिरले तर आदित्य ठाकरे हे समुद्राच्या दिशेने जात होते. यावेळी एका अरुंद गल्लीत दोन्ही नेते आणि त्यांचे कार्यकर्ते आमनेसामने आले. पाच मिनिटाच्या काळात दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले. यावेळी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. तसेच कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाल्याचं देखील पाहायला मिळालं. दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना वेगळं करण्यात पोलिसांनी मिळालं. त्यामुळे मोठी दुर्घटना घडली नाही. यावेळी आदित्य ठाकरेंसोबत दादर माहीमचे आमदार महेश सावंत आणि आमदार सुनील शिंदे देखील उपस्थित आहेत. दरम्यान, एकनाथ शिंदेंना कोळीवाड्यात पाहिल्यावर तुम्हाला काय वाटलं? असा प्रश्न विचारला असता आदित्य ठाकरे म्हणाले की, काही लोकांना महत्त्व द्यायचं नसतं, तसं आम्ही त्यांना महत्त्व देत नाही, असे म्हणत त्यांनी राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपावर भाष्य केले.

## 'बदमाशांसारखे वागू नका,' सर्वोच्च न्यायालयाची ईडीला तंबी



**जलद सुनावणीसाठी विशेष न्यायालयांची गरज**

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी पीएमएलए प्रकरणांच्या जलद निपटारासाठी टाडा आणि पोटा न्यायालयांसारख्या विशेष न्यायालयांची गरज व्यक्त केली. ते म्हणाले, ₹समर्पित पीएमएलए न्यायालये दररोज सुनावणी घेऊ शकतात, ज्यामुळे प्रकरणांचा जलद निपटारा होईल. आरोपी अनेक अर्ज दाखल करत राहतात, पण त्यांना हे माहीत असेल की, दररोजच्या सुनावणीमुळे त्यांच्या अर्जावर दुसऱ्याच दिवशी निर्णय घेतला जाईल.

**■नवी दिल्ली । प्रतिनिधी,**
तपास यंत्रणा अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) कार्यपद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने आज तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ₹ईडी बदमाशांसारखे वागू शकत नाही, त्यांना कायद्याच्या चौकटीतच काम करावे लागेल,₹ अशा शब्दांत न्यायालयाने ईडीला खडसावले. पीएमएलए कायद्यांतर्गत ईडीच्या अटकेच्या अधिकारांना कायम ठेवणाऱ्या २०२० च्या निर्णयाचा फेरविचार करण्याच्या याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने हे मत व्यक्त केले. शिक्षेचे प्रमाण कमी असल्याबद्दल चिंता न्यायालयाने ईडीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, त्यांच्या प्रकरणांमध्ये शिक्षेचे प्रमाण अत्यंत कमी असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती उज्जल भुईया आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने म्हटले की, ₹आम्ही ईडीच्या प्रतिमेबद्दलही चिंतित आहोत न्यायमूर्ती भुईया यांनी संसदेतील एका माहितीचा दाखला देत सांगितले की, गेल्या पाच वर्षांत ईडीने नोंदवलेल्या ५ हजार आरोपींपैकी १० टक्क्यांपेक्षा कमी आरोपींना शिक्षा झाली आहे. न्यायालयाने पुढे विचारले की, जर ५ ते ६ वर्षांच्या न्यायालयीन कोठडीनंतर लोक निर्दोष सुटले, तर त्याचा खर्च कोण उचलेल?₹ यावर, केंद्र आणि ईडीच्या वतीने बाजू मांडणाऱ्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस.व्ही. राजू यांनी कमी शिक्षेचे प्रमाण 'प्रभावशाली आरोपींच्या दिरंगाईच्या युक्त्यांमुळे' असल्याचे म्हटले. न्यायमूर्ती कांत यांनी न्यायव्यवस्थेवरील ताणही अधोरेखित केला. ते म्हणाले की, एका दंडाधिकाऱ्याला एका दिवसात ४९ अर्जांवर निर्णय घ्यावा लागतो, आणि प्रत्येक अर्जावर १० ते २० पानांचा आदेश द्यावा लागतो. ही परिस्थिती जास्त काळ चालू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## म्हाडा मुंबई मंडळातर्फे होणार १४९ अनिवासी गाळ्यांचा ई-लिलाव

**■मुंबई । प्रतिनिधी,** मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) मुंबईमधील विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या परिसरातील अनिवासी गाळ्यांच्या विक्रीसाठी आयोजित ई-लिलावाकरिता ऑनलाईन नोंदणी व अर्ज प्रक्रियेला १२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून प्रारंभ होणार आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी दिली. सदर लिलावात मुंबईतील मुलुंड गव्हाणपाडा येथे ०६ अनिवासी गाळे, कुर्ला- स्वदेशी मिल येथे ०५, तुंगा पवई येथे ०२, कोपरी पवई येथे २३, चारकोप येथे २३, जुने मागाठाणे बोरीवली पूर्व येथे ०६, महावीर नगर कांदिवली पश्चिम येथे ०६ अनिवासी गाळे, प्रतीक्षा नगर सायन येथे ०९, अँटॉप हिल वडाळा येथे ०३, मालवणी मालाड येथे ४६ अनिवासी गाळे, बिंबिसार नगर गोरेगाव पूर्व येथे १७ अनिवासी गाळे व शास्त्री नगर-गोरेगाव, सिद्धार्थ नगर, मजासवाडी जोगेश्वरी पूर्व येथे प्रत्येकी ०१ अनिवासी गाळा विक्रीसाठी उपलब्ध आहे. २८ ऑगस्ट, २०२५ सकाळी ११.०० वाजेपासून सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संगणकीय प्रणालीमध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी ऑनलाइन बोली स्वरूपातील ई-लिलाव www.eauction.mhada.gov.in या संकेतस्थळावर होणार आहे. दि. २९ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता https://eauction.mhada.gov.in व https://mhada.gov.in या दोन्ही संकेतस्थळांवर ई-लिलावाचा एकत्रित निकाल जाहीर करण्यात येणार आहे. मुंबई मंडळातील अनिवासी गाळ्यांच्या ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी https://eauction.mhada.gov.inसंकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे यासाठी दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून ते दि. २५ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

## शारदा एज्युकेशन सोसायटीच्या अँबर इंटरनॅशनल स्कूलमध्ये मुंबई व ठाण्यातील पहिल्या ‘स्पेस अँड इनोव्हेशन लॅब’चे लोकार्पण - पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर करतील उद्घाटन आणि देतील पाठबळ

**■मुंबई । प्रतिनिधी,**
मुंबई आणि ठाण्याच्या शैक्षणिक व वैज्ञानिक क्षेत्रात नवे पर्व सुरू करणाऱ्या ऐतिहासिक घडामोडीत, शारदा एज्युकेशन सोसायटीच्या अँबर इंटरनॅशनल स्कूलच्या उच्चस्तरीय प्रतिनिधीमंडळाने भारतातील नामांकित वैज्ञानिक, नवोन्मेषप्रवर्तक आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेते डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या निवासस्थानी भेट दिली. या प्रतिनिधीमंडळात डॉ. प्रदीप धवळ (विश्वस्त), डॉ. प्रतिक मुणगेकर (संचालक – संशोधन, नवोन्मेष व आंतरराष्ट्रीयीकरण, तसेच संचालक – स्पेस अँड इनोव्हेशन लॅब) आणि श्री. कल्पेश जाधव (लॅब मॅनेजर व कार्यक्रम आऊटरीच प्रमुख) यांचा समावेश होता.

या भेटीचा उद्देश डॉ. माशेलकर यांना मुंबई आणि ठाण्यातील पहिल्या ‘स्पेस अँड इनोव्हेशन लॅब’च्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करणे हा होता. त्यानंतर झालेली जवळपास दोन तासांची चर्चा ही विज्ञान, तंत्रज्ञान, नवोन्मेष, उद्योजकता आणि भारताच्या भविष्यातील



ज्ञानआधारित अर्थव्यवस्था या विषयांवरील प्रेरणादायी संवादसत्र ठरली.

संवादाच्या सुरुवातीला डॉ. माशेलकर यांनी स्पष्ट केले की भारताचा भविष्यातील मार्ग हा ‘ज्ञानाची अर्थव्यवस्था’ उभारण्यावर आधारित असला पाहिजे – जिथे ज्ञान हे सर्वात मौल्यवान चलन ठरेल आणि जिथे मानवी कल्पकता व बौद्धिक भांडवल हे भौतिक संसाधनांपेक्षा जास्त महत्त्वाचे ठरेल. नैसर्गिक साधनसंपत्ती मर्यादित असते, पण कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता या अमर्याद असतात, आणि हाच भारताला जागतिक पातळीवर नेतृत्व मिळवून देणारा मार्ग आहे, असे त्यांनी नमूद केले.

उद्योजकतेवर बोलताना त्यांनी तिचे फायदे आणि तोटे दोन्ही सांगितले. प्रेरणादायी यशोगाथांचा उल्लेख करताना त्यांनी अल्पकालीन नफा आणि अस्थिर व्यावसायिक पद्धतींच्या धोक्यांबाबतही इशारा दिला. भारताच्या GDPची तुलना करताना त्यांनी काही आघाडीच्या अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्यांच्या वार्षिक उत्पन्नाशी साधर्म्य दाखवले – कधी कधी एका कंपनीचे उत्पन्न भारताच्या काही क्षेत्रांतील GDP इतकेच असते.

मात्र त्यांनी हे निराश होण्याचे कारण नसून सकारात्मक कृतीसाठीचे आवाहन असल्याचे सांगितले: भारताकडे प्रचंड प्रतिभा, तरुणाईची ऊर्जा आणि दृष्टी आहे, जी हा अंतर ethically आणि टिकाऊ मार्गाने भरून काढू शकते.

त्यांनी ठामपणे सांगितले की नैतिक नवोन्मेष – म्हणजे प्रामाणिकपणा, सर्वसमावेशकता आणि टिकाऊपणावर आधारित नवोन्मेष – हाच एकमेव खरा मार्ग आहे. “फक्त जलद गतीने वाढणे नव्हे, तर योग्य पद्धतीने वाढणे” हेच महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. शिक्षण आणि संशोधन हे मूल्यांसोबत चालले पाहिजे, ज्यामुळे प्रगती ही संपूर्ण समाजाला उन्नत करणारी आणि कुणालाही मागे न टाकणारी ठरेल.

त्यांनी स्वतः मांडलेले सुप्रसिद्ध तत्त्व पुन्हा अधोरेखित केले – “अधिकांसाठी, कमी साधनांतून, अधिक निर्माण करणे” – म्हणजेच कमी संसाधनांतून जास्तीत जास्त परिणाम घडवून आणणे, आणि तेही अधिकाधिक लोकांच्या हितासाठी. त्यांनी शैक्षणिक संस्थांना आवाहन केले की विद्यार्थ्यांमध्ये ही विचारसरणी रुजवावी – त्यांना केवळ नोकरी करणारे नव्हे, तर नोकऱ्या निर्माण करणारे आणि खरी जीवनातील समस्यांचे समाधान करणारे बनवावे.

बैठकीच्या शेवटी डॉ. माशेलकर यांनी स्पेस अँड इनोव्हेशन लॅबच्या उद्घाटनासाठीचे आमंत्रण आनंदाने स्वीकारले आणि शारदा एज्युकेशन सोसायटीला आपला पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. या धाडसी उपक्रमाबद्दल त्यांनी अभिनंदन करताना विश्वास व्यक्त केला की ही लॅब भविष्यातील नवनिमार्ते, नेते आणि परिवर्तनकर्त्यांना घडवणारे केंद्र बनेल.

स्पेस अँड इनोव्हेशन लॅब ही अत्याधुनिक सुविधा असून विद्यार्थ्यांना अवकाश विज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरविषयक संशोधन यांचा अभ्यास करण्याची संधी मिळेल – ज्यामुळे ते जागतिक दृष्टीकोन ठेवून, नैतिकतेने वागून, निर्भयपणे नवोन्मेष करतील.

डॉ. माशेलकर यांचे आशीर्वाद, शारदा एज्युकेशन सोसायटीची बांधिलकी आणि पुढील पिढीचा उत्साह यांच्या जोरावर, मुंबई आणि ठाणे हे ज्ञानाधारित, नैतिक आणि टिकाऊ नवोन्मेषाच्या नव्या युगाचे स्वागत करण्यास सज्ज आहेत.

## नराधम शिक्षकाचा तिसरीतल्या विद्यार्थीवर अत्याचार, आई-वडिलांवर दबाव

### अखेर 5 जणांविरुद्ध गुन्हा




**■अहिल्यानगर । प्रतिनिधी,**
जिल्ह्याच्या पाथर्डी तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेतील तिसरीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर शाळेतीलच शिक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात 5 जणांविरोधात पोक्सो आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहेत. पीडीत मुलीच्या आईच्या तक्रारीनंतर पोलिसांनी आज हा गुन्हा दाखल केला असून 4 आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र, मुख्य आरोपी शिक्षक हा पसार झाला आहे, पोलिसांची पथके शिक्षकांच्या शोधासाठी पाठविण्यात आल्याची माहिती अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली. मुलीच्या आईने दिलेल्या फियार्नुसार, 1 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत पीडित मुलीवर शाळेच्या परिसरातच जबरदस्ती करण्यात आल्याचा आरोप आहे. संबंधित मुलीला दुपारच्या जेवणाच्या सुट्टीच्यावेळी संजय फुंदे हा नराधम शिक्षक वर्गात बोलावून घेत, तसेच तिच्यावर अत्याचार करत होता. या घडलेल्या प्रकारासंदर्भात मुलीने आपल्या आईला कल्पना दिली, त्यानंतर तिचे आई आणि वडील हे जाब विचारण्यासाठी शाळेत गेले असता त्यांच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आईने दिलेल्या फियार्दीत म्हटले आहे. विशेष म्हणजे गावात कामानिमित्त आलेले संबंधित कुटुंबीय हे परप्रांतीय असल्याने स्थानिकांकडून हे प्रकरण मिटवण्यासाठी दबाव टाकला जात असल्याची चर्चा आहे. याप्रकरणी संजय उत्तम फुंदे, आदिनाथ रामनाथ दराडे, राजेंद्र सूर्यभान दराडे, मुनव्वर खान सर्वरखान पठाण, उमर नियाज पठाण यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याबाबत स्थानिक पोलिसांना विचारले असता त्यांच्याकडून माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचे पाहायला मिळत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी फरार असल्याची माहिती असून इतर चार जणांना ताब्यात घेण्यात आल आहे.

**पोलीस अधीक्षकांनी दिली माहिती**

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीने आईला घडलेली घटना सांगितली, मात्र गावातील काही प्रतिष्ठितांकडून पीडित कुटुंबीयांवर दबाव टाकला जात होता. त्यामध्ये, ग्रामपंचायत सदस्यासह इतरही 4 जणांचा समावेश होता. अखेर, पीडित महिलेने मुलीच्या वडिलांना सोबत घेऊन याबाबत पोलिसात तक्रार दिल्यानंतर आरोपींविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# बहुभाषक भारताचे भाषिक निर्वसाहतीकरण

भाषा, संस्कृती आणि अभिव्यक्ती यांच्या अन्योन्यसंबंधांचा मागोवा आपण गेले काही लेख पाहत आहोत. आतापर्यंतच्या चिंतनाचा धागा हा भाषिक वसाहतवादामुळे भारतीय संस्कृतीच्या भारतीय अभिव्यक्तीवर येणार्या मयार्दांच्या दृष्टिकोनातून होता. आज आपण त्याच्या एका वेगळ्या बाजूचा विचार करू. वसाहतवादी प्रभावाने केवळ आपली अभिव्यक्तीच प्रभावित होते असे नाही, तर आपले स्व-विषयक चिंतन आणि आकलनही एक प्रकारे बदलते किंवा बदलले आहे. समाज, संस्कृती आणि राष्ट्र यांच्या अस्तित्वाचे आधार आणि त्यांचे परस्परसंबंध यांचे एक विशिष्ट प्रकारचे चिंतन हिंदू परंपरेत विकसित झाले आहे. दीर्घकाळच्या पाश्चात्य शिक्षणातून, पाश्चात्य भाषांतून या चिंतनाचे अपूर्ण भाषांतर करून व त्या अपूर्ण तसेच, पूर्णत्व मानून आणि या विषयातील पाश्चात्य चिंतनाला, त्यांच्या पारिभाषिक शब्दांना हिंदू तत्सम विचारांशी आणि शब्दयोजनांशी समकक्ष धरून सतत ज्या प्रकारची मांडणी झाली आहे, त्यामुळे आपले विशिष्ट चिंतन आपल्याच विस्मृतीत जाऊ लागले आहे का काय, अशी भीती निर्माण झाली आहे. भाषा, संस्कृती, राष्ट्र या संकल्पनांमधील काही भेदांचा आज आपण विचार करू. आधुनिक राष्ट्रवादाची मातृभूमी समजल्या जाणार्या युरोपचा राष्ट्रवाद हा भाषिक भेदांवर आधारित आहे. युरोपमध्ये पुनरुज्जीवन काळात किंवा त्यानंतरच्या काळात ज्या फ्रेंच किंवा जर्मन राष्ट्रांचे निर्माण किंवा एकीकरण केले गेले, त्यात समान भाषा या तत्त्वाचा आधार मुख्य होता. जर्मन भाषक राज्यांचे एकीकरण हे प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मन एकत्रीकरणाचे मुख्य सूत्र होते. राष्ट्रभावनेस चालना देणार्या जर्मन भाषेतील साहित्याची निर्मिती हा त्या वेळचा जर्मन नेत्यांचा एक प्रमुख आग्रह होता. त्याचबरोबर जर्मन परंपरांचे पुनरुज्जीवन, हाही भाग त्यात होता. ख्रिस्ती धर्माच्या आपल्या अनुभवावरून आपल्याला असे वाटते की, नाताळ हा सर्व ख्रिस्ती लोकांचा महत्त्वाचा सण! पण, तो साजरा करण्यात अनेक स्थानिक भेद आहेत. त्याचबरोबर ख्रिस्ती पंथ स्वीकारला असला, तरी युरोपातील अनेक देशांमध्ये अजूनही त्यांच्या प्राचीन परंपरा विविध स्वरूपात जतन केलेल्या आहेत. एकभाषक लोकांच्या एक परंपरा ॅअसा काहीसा विचार मांडून जर्मन परंपरांचे दृढीकरण अशा आग्रहातून आजचे जर्मन राष्ट्र उभे राहिले आहे. फ्रेंच राज्याच्या निमार्णातही फ्रेंच भाषेचा, किंबहुना पॅरिसच्या फ्रेंच भाषेचा मोठा वाटा आहे. फ्रेंच भाषेच्या विविध बोलींमुळे राष्ट्रीय एकीकरणात कोणतीही अडचण येऊ नये, म्हणून त्यांनी भाषेचे प्रमाणीकरण करून पॅरिसची फ्रेंच भाषा हीच योग्य फ्रेंच असे घोषित केले. स्पेनच्या सीमेवरील फ्रेंच भागात ज्या बोली किंवा भाषा बोलल्या जात, त्यांची जवळीक स्पॅनिश भाषेशी आहे. या भागात ऑसिटान आणि बास्क सारख्या भाषा फ्रेंच बाजूला, तर कॅटलान भाषा स्पेन बाजूला बोलल्या जातात. तरीही पॅरिसची फ्रेंच भाषा ही फ्रेंच भागातील अधिकृत भाषा आहे आणि कॅटलान भाषकांना आज वेगळा देश हवा आहे. थोडयात, भाषिक वेगळेपण आणि भाषिक सपाटीकरण हा युरोपीय देशांच्या राष्ट्रवादाचा गाभा आहे. राष्ट्रवादाची युरोपातील पहिली मांडणी ही भाषिक भेदांच्या आधारावर झाली आहे आणि अजूनही अनेक छोट्या भाषिक गटांना त्यांचे राष्ट्रीय वेगळेपण निर्माण करायचे आहे. युरोपच्या राष्ट्रवाद संकल्पनेचा उगम आपण एक प्रकारे बायबलमधील बाबेलच्या मनोर्याच्या कथेत पाहू शकतो. या कथेनुसार जगातल्या सर्व मानवांनी (म्हणजे ईश्वराचा संदेश प्राप्त झालेल्या सर्व मानवांनी, त्यात हिंदू वगैरे येत नाहीत) एक मनोरा बांधायचे ठरवले. हा मनोरा त्यांना आकाशात राहणार्या त्यांच्या ईश्वराच्या घरापर्यंत बांधायचा होता. ईश्वराला काही त्यांचा हा स्वतःच्या घरी थेट पोहोचण्याचा प्रकल्प पसंत पडला नाही. त्यामुळे ईश्वराने मानवांमध्ये भेद निर्माण करण्याचे ठरवले. त्याने प्रत्येक समूहास वेगळी भाषा दिली. आता या सर्व लोकांना एकमेकांशी संवाद साधता येईना. परेही परते बोलणे खुंटल्यामुळे आणि वैखरीचा शोध लागला नसल्यामुळे एकंदर प्रकल्प बारगळला आणि बाबेलचा मनोरा काही पूर्ण होऊ शकला नाही. युरोपमधील भाषाभेद हे एक प्रकारे ईश्वरनिर्मित आहेत, असा एक अर्थ या बाबेलच्या मनोर्याच्या कथेचा काढता येतो. त्यामुळे भिन्नभाषक समाज हे भिन्न राष्ट्रे आहेत, अशी समजूत निर्माण होते. भाषा आणि समाज यांच्यातील संबंधांचे हे विशिष्ट आकलन युरोपीय राष्ट्रवादाच्या मुळाशी आहे, असे मानले जाते. या सर्व पार्श्वभूमीवर बहुभाषक भारताच्या राष्ट्रीयत्वाचा आधार काय, हे तपासून पाहायची गरज आहे. राष्ट्र संकल्पना जरी पुरातन असली, तरी राष्ट्रवाद संकल्पना आधुनिक असल्याचे म्हटले जाते. या विधानाचा नेमका गर्भितार्थ समजून घेण्याची आज आवश्यकता आहे. हिंदू (किंवा कोणत्याही अन्य राष्ट्रीय समाजाची) राष्ट्र संकल्पना नाकारून राष्ट्रवाद या ज्ञानशाखेचा अभ्यास हा केवळ आधुनिक काळात मांडल्या गेलेल्या युरोपीय मतापुरता सीमित असल्याचे यातून ध्वनित होते. हिंदू तत्त्वज्ञानाचा भाषा आणि समाज किंवा राष्ट्र यांच्या परस्परसंबंधांचा विचार या सर्व मांडणीहून सर्वथा वेगळा आहे. यासंदर्भात आपण एकं सत विप्रा बहुधा वदन्ति या सूत्राचा किंचित वेगळा अर्थ पाहू शकतो. आधी अनेकदा म्हटल्याप्रमाणे भाषाकुलांमधील सांस्कृतिक फरक हा एका अथार्ने आशयातील सांस्कृतिक फरक असतो. त्याउलट जर आशयात भिन्नता नसेल, तर त्याच्या अभिव्यक्तीतील भिन्नतेने अर्थांतरण होत नाही. एकाच समान भावाचे प्रकटीकरण भिन्न उदाहरणांच्या, उपमांच्या, भाषिक अलंकारांच्या माध्यमातून विविध चिंतक तत्त्ववेत्ते करत असतात. विभिन्न अभिव्यक्तींच्या मागे दडलेला समान भाव समान लोकसमुदाय निश्चित करतो. यातूनच समान संस्कृती आणि समान राष्ट्राचे निर्माण होते. त्यामुळे विभिन्न मानव समाजांची भिन्नता त्यांच्या अभिव्यक्तीच्या भाषेने नव्हे, तर त्यातील आशयामुळे ठरते. याहीपुढे जाऊन अखिल मानवसमाजाचा म्हणून काही समान आशय असतो. त्यामुळे राष्ट्रभिन्नता ही द्वेषमूलक नसून केवळ व्यवहारनिदर्शक असते. युरोपच्या बाह्यांगाकडे लक्ष देण्याच्या प्रवृत्तीस आणि भारताच्या अंतरंगाकडे लक्ष देण्याच्या प्रवृत्तीस अनुसरूनच ही दोन भाषा आणि राष्ट्रीयत्वाच्या संबंधाविषयीची प्रतिमाने आहेत. युरोप केवळ भाषिक भेद पाहतो, तर भारत भाषेच्या पलीकडे जाऊन भावातील समानता पाहतो. त्यामुळे भारतात भिन्नभाषक विविध प्रांत असूनही, त्यांच्यात भिन्न राष्ट्रत्वाची भावना असल्याचे दिसत नाही. भाषेच्या प्रमाणीकरणाचेही प्रयत्न हे ब्रिटिश राजवटीतच झाल्याचे आपल्याला दिसतात. त्यापूर्वी प्रमाण मराठी कुठली, असा प्रश्न कोणी विचारल्याचे आढळत नाही. भाषेच्या विविध बोलींमधील प्रवाहीत्व जपत आणि प्रांतांच्या सीमांवर या बोलींचा मिलाफ होत, भाषांचा कदाचित एक सलग वर्णपटच संपूर्ण भारतीय प्रदेशात अस्तित्वात होता. ज्ञानभाषेचे काम संस्कृतला दिलेले असल्याने इतर भाषांच्या प्रमाणीकरणाची आवश्यकताही नव्हती. आज आपण पाहत असलेले प्रमाणीकरण कंपनी सरकारच्या काळात ब्रिटिश अधिकार्यांच्या सोयीसाठी जरी झाले असले, तरी असे प्रमाणीकरण व्हावे, ही संकल्पना युरोपच्या भाषिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेशी जवळीक साधताना आपल्याला दिसते. भाषिक निर्वसाहतीकरणाचा विचार करताना, भाषा आणि राष्ट्र यांमधील संबंधांचा पुनर्विचार आणि या चिंतनाचेच निर्वसाहतीकरण याची प्राधान्याने आवश्यकता आहे. भाषावार प्रांतरचनेचा अवलंब करून आपण स्वातंत्र्यानंतरचे पहिले पाऊल चुकीच्या दिशेने टाकलेलेच आहे. परंतु, यापुढील मार्गक्रमणेत भारतीय भाषांच्या अभिव्यक्तीतील समानतेवर भर देऊन त्यांच्यातील परस्परसंवाद वाढवण्यावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. मातृभाषेत शिक्षण हे तत्त्व आज सर्वमान्य आहे आणि आपल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात समाविष्टही केलेले आहे. मात्र, भाषा आणि भाषाशिक्षण याकडे आज संवादकौशल्याचे साधन इतया मर्यादित अथार्ने पाहिले जाते. भाषाशिक्षण म्हणजे, त्या भाषेतील समृद्ध साहित्यपरंपरेचे आणि भाषाशास्त्रविषयक व्याकरणादि विचारांचेही शिक्षण. स्वभाषेचे पक्के सर्वांगीण ज्ञान झाल्यावर आपल्या भाषाकुलातील अन्य भाषाभगिनींचेही आपले ज्ञान स्वाभाविकपणे वाढते आणि त्या भाषांच्या अभिव्यक्तीच्या आशयातील अभिन्नत्व ध्यानात येऊ लागते. स्वभाषेचे ज्ञान मर्यादित राहिल्यास हे आशयातील अभिन्नत्व कसे जाणवू शकेल? आणि अशा जाणिवेच्या अभावातून प्रांतवाद, सीमावाद आणि भिन्न राष्ट्रवाद हेच अंतिमतः निर्माण होणार. हा सर्व विचार ध्यानात घेता, भाषिक निर्वसाहतीकरणाचे काही आयाम आपण निश्चित करू शकतो. सर्वप्रथम म्हणजे, स्वभाषेचा अभ्यास आणि वापर. सामान्यातिसामान्य व्यवहारापासून उच्च श्रेणीच्या भाषा व्यवहारांमध्ये स्वभाषेचा वापर वाढल्याशिवाय भाषिक निर्वसाहतीकरण शय नाही. स्वभाषेच्या वापरात प्रमाणभाषेचा आग्रह अजिबात न धरणे आता अशय आहे. पण, प्रमाणभाषेस अन्य बोलींपेक्षा श्रेष्ठ न समजणे भावाच्या भारतीय प्रकटीकरणासाठी आवश्यक आहे. हा अभ्यास वाढल्यावर स्वाभाविक घडणारी गोष्ट म्हणजे, आपल्या भाषाभगिनींचे अधिक समृद्ध आकलन आणि त्याचबरोबर संस्कृत भाषेचेही अधिक समृद्ध आकलन. हा दुसरा आयाम सहजसाध्य स्तराच्या पुढे जाऊन समाजाच्या किमान काही वगार्ची भाषिक जाण प्रयत्नपूर्वक अधिक समृद्ध करणे असा असेल. हिंदू संस्कृतीच्या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनात्मक विषयांचे प्रकटीकरण आणि ग्रहण किंवा आकलन आग्रहाने भारतीय भाषांच्या माध्यमातूनच करणे आणि भाषांतर न करता मूळ शब्द तसेच वापरून संकल्पनात्मक गोंधळ टाळणे, हा तिसरा आयाम असेल. या तिसर्या आयामाचे प्रभावक्षेत्र हे केवळ भारतीय समाज असे न ठेवता, जागतिक विमर्श या आयामाच्या अंतर्गत प्रयत्नपूर्वक बदलावा लागेल. हे तिन्ही आयाम क्रमागत नसून एकाच वेळी विभिन्न स्तरांवर आपल्याला चालवावे लागतील. जसजसे आपण या दिशेने पुढे मार्गक्रमण करू, तसे कदाचित अधिकचे आयामही ध्यानात येतील. या सर्व आयामांवर सतत काम करीत राहावे लागेल. भाषिक निर्वसाहतीकरण हे सांस्कृतिक व वैचारिक निर्वसाहतीकरणासाठी एक विस्तृत राजमार्ग बनवण्याचे कार्य आहे.

# कबूतर जा.. जा.. जा!

महाराष्ट्रात सध्या राजकीय व्यासपीठावर नेहमीच्या आरोप-प्रत्यारोपांना थोडा विराम मिळाला असून चचेर्चा केंद्रबिंदू कबूतर आणि हत्ती बनले आहेत. अशा चर्चा होणे ही बाब लोकशाही प्रगल्भ झाल्याचे लक्षण मानावे लागेल. गुरुवारी सकाळपासून मुंबईच्या 53 कबूतरखान्यांचे भवितव्य आणि उच्च न्यायालयातील सुनावणी राज्याच्या चिंतनाचे प्रमुख धागे बनले होते. चर्चेच्या मंडपात आरोग्याच्या शुद्धतेसाठी झगडणारे, पर्यावरणाच्या नाजूक समतोलासाठी आवाज उठवणारे, सामाजिक बांधिलकीचे भान जपणारे आणि धर्माच्या नावावर सर्वकाही स्वीकारायला तयार असलेले भक्तिरसात बुडालेले नागरिक हे सगळे आपापली भूमिका घेऊन उतरले होते. या संमिश्र गदारोळात प्रश्न केवळ कबूतरांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर समाज किती सहिष्णू, किती सजग आणि कधी अंधश्रद्धेच्या गुहेत पुन्हा शिरतोय हे ठळकपणे अधोरेखित करणारा ठरला. खरे तर, ब्रिटिशकालीन मुंबईत जेव्हा शहर आकार घेत होते, तेव्हा काही प्रमुख जैन व्यार्पायांनी कबूतरांसाठी विशिष्ट ठिकाणी दाणे टाकण्याची परंपरा सुरू केली. त्यांच्या मते, सर्व प्राण्यांवर दया हा धमार्चा मूलसिद्धांत आणि त्यातूनच निर्माण झाली कबूतरखान्यांची संकल्पना. हे ठिकाण केवळ कबूतरांवर दया दाखवणारे नव्हते, तर जैन आणि इतर काही समुदायांसाठी ते अहिंसेचे प्रतीक बनले होते. कबूतरांना अन्न देणे म्हणजे जीवदया, पुण्यसंचय



आणि पापांचं क्षालन अशा भावनांनी हे ठिकाण पवित्र मानले जाते. कबूतरांमध्ये जीव दिसणे आणि त्यांचे पोषण करणे हे पर्यावरण प्रेमासह श्रद्धेचे दर्शन असले, तरी काळ बदलला, शहर बदलले आणि कबूतरांची संख्या भरमसाठ वाढली. परंपरा टिकल्या, पण शिस्त हरवली. हे कबूतरखाने आज धार्मिक भावनेचे केंद्र न राहता शहरी आरोग्याच्या संकटाचे मूळ बनले आहेत आणि तरीही काहींना अजूनही त्यात केवळ पुण्यदायी कर्म दिसते. आज रस्त्यांवर, चौकांत, मंदिरांच्या पार्ययांवर, दुकानांच्या छपरांवर आणि रुग्णालयांच्या खिडक्यांजवळ हजारोंच्या संख्येने विखुरलेले हे पंखांचे सैन्य मानवी आरोग्यावर थेट आक्रमण करत आहे. हे सैन्य केवळ दाण्यावर जगत नाही, तर शहराच्या आरोग्यावर झडप घालते. त्यांच्या विष्ठेतील बुरशी आणि सूक्ष्मकण हवेत मिसळतात आणि जे दिसत नाही तेच अधिक घातक ठरते. ह्यपिजन लंगह्ल हा आजार म्हणजे त्याचे जिवंत उदाहरण. सतत या घाणीत वावरर्णाया नागरिकांना, विशेषतः लहान मुलांना, वृद्धांना आणि दम्याने त्रस्त लोकांना फुफ्फुसांशी संबंधित आजारांचा धोका कित्येक पटींनी वाढतो. कबूतरांच्या पंखांमध्ये पसरलेले परजीवी, विषाणू आणि बुरशीजन्य घटक शहराच्या वातावरणाला असा वेढा घालतात की साधा सायंकाळचा फेरफटकादेखील धोकादायक वाटावा. एखादे कबूतर छपरावर विसावले की, त्याच्याबरोबर एक अदृश्य रोग शहराच्या छातीत उतरतो. हे संकट इतके सवयीचे झाले आहे की आपण ते संकट मानणंच विसरून गेलो आहोत. श्रद्धेच्या चष्म्यातून पाहिले तर कबूतरं निष्पाप वाटतील, पण श्वासाच्या मागार्तून पाहिले तर ते आजाराचे उगमस्थान आहेत. म्हणूनच कबूतरखान्यांचा प्रश्न हा धार्मिक नव्हे, तर नागरी प्रश्न आहे. कोणी आपल्या घरात एवढ्या कबूतरांना ठेवेल का? मग रस्त्यावर ठेवणे योग्य कसे? धमार्ला जागा हवीच, पण ती आरोग्याच्या, कायद्याच्या आणि सामान्य नागरिकांच्या जगण्याच्या हिशोबातच. एक बाजू झाकून दुर्सया बाजूचा बळी देणे, हे नीतीमूल्य नाही. म्हणूनच कबूतरखाने हटलेच पाहिजे कारण ते शहरातील रोगांची आगारे झाले आहेत. पण कबूतरखाने एकाएकी बंद पाडणे हा जालीम उपाय होईल. वषार्नुवर्षांपासून असंख्य कबूतरे या कबूतरखान्यांमध्ये दाणे टिपायला येतात. त्यामुळे ही कबूतरे आता ऐतखाऊ झाली आहेत. त्यांचे दाणे एकाएकी बंद केल्यास ती मरायला सुरुवात होईल. त्यापेक्षा अन्य सन्माननीय पयार्यांवर विचार व्हायला हवा. सर्वप्रथम, कबूतरांना ठरावीक जागी अन्न देण्याचा पर्याय तयार करणे आवश्यक आहे. अन्नाची ओढ निर्माण झाल्याशिवाय हे पक्षी विशिष्ट ठिकाणी एकत्र राहत नाहीत. त्यामुळे नियंत्रित खुराक केंद्र उभारणे हे पहिले पाऊल असायला हवे. अशा जागा ज्या रहिवासी भागांपासून, रुग्णालयांपासून आणि शाळांपासून दूर असतील, जिथे पर्यावरण नियंत्रित ठेवता येईल. त्याचबरोबर, कबूतरांची संख्या नैसर्गिकरित्या कमी व्हावी यासाठी प्रजनन नियंत्रणासारखे उपाय करणं गरजेचे आहे. अनेक देशांनी ह्यपक्षीप्रजनन मयार्दाह्ल ही नीती आखली आहे, जी येथेही प्रभावीपणे राबवता येईल. कबूतरांची अंडी हटवणे किंवा त्या ठिकाणी विशिष्ट जैविक प्रतिबंधकांचा वापर करणे ही कठोर वाटणारी पण दीर्घकालीन परिणामकारक दिशा ठरू शकते. मात्र, यासाठी फक्त सरकारच नव्हे तर जनतेचे आणि विशेषतः त्या धार्मिक समूहांचे सहकार्य आवश्यक आहे जे आज या कबूतरखान्यांच्या रक्षणासाठी उभे आहेत. शेवटी, कबूतरखाने हे अचानक हटवून नव्हे, तर हळूहळू, पद्धतशीरपणे, जबाबदारीने विसर्जित होणे आवश्यक आहे. प्रत्येक बंद होणारा कबूतरखाना म्हणजे शहराच्या फुफ्फुसाला मिळालेली थोडी मोकळीक असेल. पण त्याचवेळी, कबूतरांची जबाबदारी विसरता कामा नये. शहराबाहेर, निसर्गाच्या जवळ, जिथे माणसांची घुसमट नसेल आणि त्यांचे अस्तित्व त्रासदायक ठरणार नाही अशा ठिकाणी त्यांचे पुनर्वसन व्हायला हवे. जेव्हा हे सगळे सुबुद्धतेने, समजुतीने आणि सुसंवादातून होईल, तेव्हा मुंबईकर सुटकेचा निश्वास सोडतील. एखाद्या चित्रपटाच्या शेवटासारखा तो क्षण उरेल, जेथे नागरिक हसत म्हणतील, कबूतर जा... जा ... जा!

# ‘स्थानिक’ निवडणुकांचे बिगुल

शिमगा गेला अन उरले कवित्व याच धर्तीवर कोरोना गेला तरी निवडणुका होईना, अशी परिस्थिती महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये २०२० पासून सुरू आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांचा अपवाद वगळता महाराष्ट्रामध्ये मागील साडेपाच वर्षांमध्ये कोणत्याही प्रकारच्या निवडणुका झालेल्या नाहीत. सत्तेशिवाय राजकीय घटक जगूच शकत नाही, असे राजकारणामध्ये उपहासाने म्हटले जाते. राजकीय जीवनात कार्यरत असणाऱ्या प्रत्येकालाच निवडणुकीचे आकर्षण असते. निवडणूक लढविण्याची महत्त्वाकांक्षा असते. निवडणुकीच्या माध्यमातूनच सत्तेची फळे चाखावयास मिळत असल्याने निवडणूक लढवू इच्छिणारा पाच वर्षे त्यासाठीच मोचेर्बांधणी करतो. घराकडे दुर्लक्ष करून जनसामान्यांचे हित जोपासण्याचे, त्यांच्या गळ्यातील ताईत होण्यासाठी धडपडतो. जेणेकरून त्यांच्या मनामध्ये आपल्याविषयी एक चांगली प्रतिमा निर्माण व्हावी आणि त्यातूनच त्यांचे प्रेम मतपेटीच्या माध्यमातून मतदानात रूपांतरित व्हावे, हाच त्यामागील एककलमी उद्देश असतो. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ओबीसी आरक्षणामुळे न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्या होत्या. सुरुवातीला दोन-अडीच वर्षांचा काळ कोरोना महामारीमुळे गेला. कोरोना काळात जगण्यासाठीचा



संघर्ष महत्त्वाचा असल्याने निवडणुका होणे शक्यच नव्हते. त्यानंतर ओबीसी आरक्षणावरून न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाल्याने निवडणुकांना विलंब झाला. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हाव्यात यासाठी निवडणुका लढवू पाहणाऱ्या इच्छुकांनी गेल्या काही महिन्यांपासून जणू काही आपल्या घरातील देवच पाण्यात ठेवले होते; परंतु न्यायालयीन प्रक्रियेस विलंब होत गेल्याने, सुनावणीदरम्यान तारीख पे तारीख पडत गेल्याने निवडणुका तब्बल पाच ते साडेपाच वर्षे लांबणीवर पडल्या.

कोरोना रुग्ण सोसायटीमध्ये आढळल्यावर प्रशासनाकडून सॅनिटायझेशन होण्यापूर्वीच राजकीय घटकांनी ते काम प्रामाणिकपणे पार पाडलेले असायचे. सोसायटीच्या प्रवेशद्वारावरच फळांच्या, भाज्यांच्या गाड्या उपलब्ध असायच्या. घरात कोरोना रुग्ण आढळल्यास त्या घरामध्ये दूध, भाज्या पोहोचविण्याचे कामही झटपट होत असे. पक्षीय मतभेद विसरून सर्वजण समाजसेवा या एकमेव ध्येयाने झपाटल्यागत कार्यरत होते. अखेरीला निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वीच निकाल जाहीर केल्याने प्रभागरचना, ओबीसी आरक्षण आदी सर्व चित्र स्पष्ट झाले आहे. निकालानंतर लगेचच दिवाळीनंतर निवडणुकांचे बिगुल वाजणार असल्याचे चित्र स्पष्ट होताच इच्छुक मंडळींच्या व त्यांच्या पक्षांच्या मोचेर्बांधणीला पुन्हा वेग आला आहे. विधानसभा, लोकसभा मतदारसंघावर वर्चस्व प्रस्थापित करायचे असेल अथवा असलेले वर्चस्व राखायचे असेल, तर स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात असणे आवश्यक असते. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांवर वर्चस्व असले, त्या त्या सभागृहांमध्ये आपल्या पक्षांचे अधिक सदस्य असले आणि त्या सदस्यांमध्ये सर्वाधिक आपले समर्थक व कार्यकर्ते असल्यावर लोकसभा व विधानसभा मतदारसंघ राखणे व जिंकणे अवघड जात नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुती व महाविकास आघाडीमध्येच होणार आहेत. महायुतीच्या तुलनेत महाविकास आघाडीत तुलनेने कमकुवत असल्याने तसेच बदलत्या राजकीय प्रवाहात महाविकास आघाडीच्याच अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. राज्यातील काही ग्रामीण भागांचा अपवाद वगळल्यास अन्य सर्वत्रच राष्ट्रवादीच्या तुलनेत भाजप व शिवसेना प्रभावशाली आहे. भाजपला मुंबई महापालिकेवर आजतागायत कधीही एकहाती सत्ता मिळालेली नाही. शिवसेनेच्या साथीने उपमहापौर व अन्य विषय समित्यांच्या सभापती पदावरच भाजपला समाधान मानावे लागलेले आहे. मुंबई महापालिका कार्यक्षेत्राचा विचार करावयाचा झाल्यास महायुतीचे पारडे वरचढ आहे.

महाविकास आघाडीमध्ये उबाठा सेना वगळल्यास शरद पवार गटाची राष्ट्रवादी आणि काँग्रेसची परिस्थिती अवघड आहे. महायुतीमध्ये भाजपने स्वबळावर सत्ता आणण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून मुंबई शहर आणि उपनगरामध्ये कंबर कसली आहे, तरीही महायुतीमध्ये दोस्तीत कुस्ती न करता महायुती म्हणूनच दिल्लीश्वरांकडून सूचना आल्याने महायुती राज्यामध्ये या निवडणुकांना एकत्रित सामोरे जाणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. भाजपला एकहाती सत्ता मिळविण्यामध्ये खरा अडथळा हा शिवसेनेचाच आहे. मुंबई महापालिकेतील जवळपास ११५ माजी नगरसेवकांचा शिवसेनेत समावेश आहे. भाजपचे नवी मुंबई, पनवेलमध्ये प्राबल्य आहे. नवी मुंबईतही मुंबईसारखेच राजकीय चित्र आहे. नवी मुंबईत स्वबळावर सत्ता आणण्यासाठी भाजपला महाविकास आघाडीऐवजी शिवसेनेचाच अडथळा असणार आहे. त्यामुळे भाजपला त्या ठिकाणी शिवसेनेशी तडजोड करावी लागण्याची शक्यता आहे.

ठाणे, कल्याण-डोंबिवली तसेच ठाण्याच्या अन्य ग्रामीण भागामध्ये शिवसेनेचे प्राबल्य आहे. मतविभागणीचा लाभ मविआच्या उमेदवाराला मिळू नये म्हणून महायुती एकत्रितपणेच निवडणुकांना सामोरे जाणार आहे. बुधवारी दिल्ली दौऱ्यामध्ये शिवसेनेचे प्रमुख नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीदरम्यान महायुतीबाबत स्थानिक निवडणुकांबाबतचे चित्र स्पष्ट केल्याचे बोलले जाते. निवडणुका जानेवारीत होणार असल्याचे बोलले जात असल्याने राजकीय चित्र ढवळून निघणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# यंदा रक्षाबंधनाचा शुभ मुहूर्त कधी?

श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला बहीण- भावाच्या नात्यासाठी खास असलेला रक्षाबंधन सण साजरा केला जातो. या पौर्णिमेला नारळी पौर्णिमा असेही म्हणतात. या दिवशी बहीण आपल्या भावाचे औक्षण करून त्याला राखी बांधते. बहीण भावाच्या दीघार्युष्यासाठी त्याला राखी बांधते तर भाऊ बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देत असतो. यंदा भावाला राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त कधी आहे, कोणत्या दिशेला बसून बहिणीने भावाला राखी बांधावी या सर्व गोष्टी आपण



जाणून घेऊया..

**रक्षाबंधन कधी आहे?**

पौर्णिमा 08 ऑगस्ट रोजी सुरू होईल. या दिवशी, भद्रा काळ आहे जो रात्री 01:52 वाजता संपणार आ-हे. यासाठी, 08 ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण साजरा केला जाणार नाही. 09 ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे करणे चांगले राहील.

**शुभ मुहूर्त कधी?**

यंदा पौर्णिमेची तिथी ही 8 ऑगस्ट रोजी दुपारी 2:12 वाजता सुरू होऊन 9 ऑगस्ट रोजी दुपारी 1:24 वाजता संपणार आहे. तर उदय तिथीमुळे 9 ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण साजरा केला जाईल. पंचांगानुसार, या दिवशी दिवसभर राखी बांधण्यासाठी शुभ मुहूर्त असेल. कारण अनेकदा रक्षाबंधनाच्या दिवशी भद्रा काळ असतो. या काळात राखी बांधणे अशुभ मानले जाते. यंदा मात्र या दिवशी भद्रा काळ नाही यामुळे दिवसभरात कधीही तुम्ही राखी बांधू शकता. 9 ऑगस्ट रोजी सकाळी 05:21 ते दुपारी 01:24 पर्यंत राखी बांधण्यासाठी शुभ काळ असेल. मात्र ही वेळ साध्य न झाल्यास तुम्ही दिवसभरात कधीही राखी बांधू शकता.

**शुभ योग**

यंदा रक्षाबंधनाच्या दिवशी सौभाग्य योग आहे. सौभाग्य योग 10 ऑगस्ट रोजी रात्री 02:15 वाजता संपेल. तर 10 ऑगस्ट रोजी सर्वार्थ सिद्धी योगाचा संयोग सकाळी 05:47 ते दुपारी 02:23 पर्यंत आहे. यासोबतच, श्रावण नक्षत्र (श्रवण नक्षत्र मुहूर्त) दुपारी 02:23 पर्यंत आहे. तर करण, बाव आणि बलव आहेत. या योगांमध्ये राखी सण साजरा केला जाईल.

**योग्य दिशा**

वास्तुशास्त्रात, ईशान्य दिशा सर्वात पवित्र आणि सकारात्मक मानली जाते. राखी बांधताना, भावाने ईशान्य दिशेला तोंड करून बसावे आणि बहिणीने त्याच्या समोर बसावे. म्हणजेच राखी बांधताना भावाचे तोंड नेहमी पूर्व किंवा उत्तर दिशेला असावे. बहिणीचे तोंड नेहमी पश्चिम किंवा दक्षिण दिशेला असावे.

**हे लक्षात घ्या झ**

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणींनी सकाळी लवकर उठावे.

पूजेच्या ताटात राखी, कुंकू, अक्षता, गोडाचा पदार्थ, निरांजन घ्यावे.

भावासाठी पाटाभोवती रांगोळी काढावी.

पाटावर बसल्यावर भावाच्या कपाळाला कुंकवाचा टिळा लावावा.

टिळा लावून झाल्यावर भावाचे औक्षण करावे.

यानंतर भावाच्या मनगटावर राखी बांधावी.

राखी बांधताना भावाच्या दीघार्युष्याची प्रार्थना करावी.

तुम्ही राखी बांधताना मंत्र म्हणू शकता.

ओम येन बद्धो बली राजा, दानवेन्द्रो महाबलः
तेन त्वाम्‌ प्रतिबद्धामि रक्षे माचलः माचल

# सोने, चांदी की रेशीम? कोणती राखी बांधणे असते शुभ?

भावा-बहिणीच्या अतूट नात्याचा सण म्हणजेच रक्षाबंधनाचा सण. दोघांमधील अतुट नात्यांच्या हा सण श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला येतो. या दिवशी बहीण आपल्या लाडक्या भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्यांच्या दीघार्युष्याची, समृद्धीची कामना करते. तर भाऊ बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो आणि सोबत तिला भेटवस्तूही देतो. या खास सणासाठी बहीण बाजारात मिळणा[?]या राख्यांपैकी आवडीची राखी भावासाठी घेऊन येते आणि भाऊरायाच्या मनगटावर बांधते. पण, भावाच्या उज्वल भविष्यासाठी आणि निरोगी आरोग्यासाठी सोने, चांदी की रेशमी धाग्याची हातावर बांधणे शुभ असते हे अनेकांना ठाऊक नसते. जाणून घेऊयात सोने, चांदी की रेशीम राखी असते शुभ



रेशीम धागा

रक्षाबंधनासाठी सामान्यपणे रेशीम धाग्याची राखी बांधली जाते. रेशमी धागा अत्यंत प्रवित्र मानला जातो. रेशमी धागा हा पवित्रता, कोमलता आणि प्रेमाचे प्रतीक असतात. त्यामुळे असे सांगितले जाते की, कापसाची किंवा रेशमी धाग्याची राखी भावाला बांधल्यास त्याचे भविष्य उज्वल होते.

चांदीची राखी

चांदीची राखी बांधणे शुभ मानले जाते. ज्योतिषशास्त्रानुसार, जर तुमच्या भावाच्या कुंडलीत चंद्र दोष असेल तर तुम्ही त्याला चांदीची राखी बांधणे फायद्याचे ठरेल. चांदी शीतलतेचे प्रतीक आहे. त्यामुळे ही राखी भावाला मानसिकदृष्ट्या शांती देऊ शकते.

सोन्याची राखी

सोने कायमच संपत्ती, समृद्धी आणि वैभवाचे प्रतीक मानले जाते. सोन्याची राखी प्रगतीची प्रतिक मानले जाते.

राखीची भावना महत्त्वाची

राखी कोणत्या धाग्याची बांधली यापेक्षा ती कोणत्या भावनेने बांधली आहे हे महत्त्वाचे असते. राखी चांदीची असो वा सोन्याची ती ख[?]या भावनेने बांधली असेल तर ती राखी हमखास शुभ आणि फलदायी असते.

राखी निवडताना या गोष्टी महत्त्वाच्या झ

राखी साधी असावी.

रेशीम किंवा कापसाच्या धाग्याची राखी सर्वात उत्तम मानली जाते.

राखीत ओम, स्वस्तिक, रुद्राक्ष अशी रत्ने असतील, ही राखी शुभ फळ देणारी असेल.

लाल, पिवळी,केशरी या रंगाच्या राख्या शुभ आणि समृद्धीच्या प्रतीक मानल्या जातात.

# राखी बांधताना धाग्याला किती गाठी बांधाव्यात?

भावा-बहिणीच्या अतूट नात्याचा सण म्हणजेच रक्षाबंधनाचा सण (फॅरॅ इंल्लॉॅल्ल 2025). दोघांमधील अतुट नात्यांच्या हा सण श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला येतो. या दिवशी बहीण आपल्या लाडक्या भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्याच्या दीघार्युष्याची, समृद्धीची कामना करते. यंदा हा सण शनिवार 9 ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. तसं पाहायला गेलं तर रक्षाबंधनाशी संबंधित अनेक परंपरा आणि श्रद्धा आहे. ज्या बहिणी विशेष लक्ष देऊन पाळतात. पण, तरीही भावाला राखी बांधताना धाग्याला किती गाठी माराव्यात हे कित्येकजणींना ठाऊक नसते, जाणून घेऊयात याविषयी सविस्तरपणे

**किती गाठी माराव्यात?**

राखी सुटू नये यासाठी धाग्याला हव्या तितक्या गाठी मारल्या जातात. खरं तर, राखी बांधताना धाग्याला तीन गाठी मारणे शुभ मानले जाते. या तीन गाठींचा संबंध त्रिदेवांशी लावला जातो. या तीन गाठी ब्रम्हा, विष्णू, महेशाला स्मरून बांधल्या जातात. जे त्रिदेव जगाचा सांभाळ करतात त्यांनी आपल्या भावाचेही रक्षण करावे, अशी बहिणीची यामागे कामना असते.

दुसरं म्हणजे या तीन गाठींचा अर्थ भावा-बहिणीच्या पवित्र ऋणानुबंधांशी जोडण्यात आला आहे.

**पहिली गाठ झ**

भावाच्या दीघार्युष्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी

**दुसरी गाठ झ**

बहिणीच्या दीघार्युष्यासाठी आणि शांतीसाठी

**तिसरी गाठ झ**

भावा-बहिणीच्या नात्यातील प्रेम वाढवण्यासाठी बांधली जाते, असे सांगण्यात येते.



# भावाला राखी बांधताय? या गोष्टी लक्षात घ्या

भावा-बहिणीच्या अतूट नात्याचा सण म्हणजेच रक्षाबंधनाचा सण. दोघांमधील अतुट नात्यांच्या हा सण श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला येतो. या दिवशी बहीण आपल्या लाडक्या भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्यांच्या दीघार्युष्याची आणि समृद्धीची कामना करते. पण, राखीचा हा सण केवळ धार्मिक विधी नसून कुटूंबाला एकत्र आणणारा, भावा-बहिणीतील प्रेम वाढवणारा सोहळा आहे. त्यामुळे रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधताना बहिणींनी काही गोष्टी लक्षात घ्यायल्या हव्यात, जेणेकरून सण विधीपूर्वक साजरा होईल.

**हे लक्षात घ्या झ**

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणींनी सकाळी लवकर उठावे.

पूजेच्या ताटात राखी, कुंकू, अक्षता, गोडाचा पदार्थ, निरांजन घ्यावे.

भावासाठी पाटाभोवती रांगोळी काढावी.

पाटावर बसल्यावर भावाच्या कपाळाला कुंकवाचा टिळा लावावा.

टिळा लावून झाल्यावर भावाचे औक्षण करावे.

यानंतर भावाच्या मनगटावर राखी बांधावी.

राखी बांधताना भावाच्या दीघार्युष्याची प्रार्थना करावी.

तुम्ही राखी बांधताना मंत्र म्हणू शकता.

ओम येन बद्धो बली राजा, दानवेन्द्रो महाबलः
तेन त्वाम्‌ प्रतिबद्धामि रक्षे माचलः माचल

भद्राच सावटं यंदा आहे का नाही?

शास्त्रानुसार, भद्र काळात रक्षाबंधन सण साजरा केला जात नाही. या काळात भावाल राखी बांधणे शुभ मानले जात नाही. पण, यंदा रक्षाबंधनावर भद्राचं सावट नसणार आहे.

# रक्षाबंधनच्या दिवशी राशीनुसार काय भेटवस्तू द्यावी?

रक्षाबंधन हा सण भावा-बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधतात आणि कपाळावर टिळा लावतात आणि त्यांच्या दीघार्युष्याची कामना करतात, त्याचबरोबर भाऊ आपल्या बहिणीला आयुष्यभर संरक्षणाची हमी देतो. २०२५ मध्ये, रक्षाबंधनाचा सण ९ ऑगस्ट २०२५, शनिवारी साजरा केला जाईल. दरवर्षी सावन महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी रक्षाबंधन साजरा केला जातो. रक्षाबंधन हा एक महत्वाचा हिंदू सण आहे, जो भाऊ आणि बहिणीच्या अतूट प्रेम आणि संरक्षणाच्या नात्याचा उत्सव आहे. या दिवशी, बहीण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्याच्या दीघार्युष्यासाठी, समृद्धीसाठी प्रार्थना करते, तर भाऊ बहिणीला आयुष्यभर तिचे संरक्षण करण्याचे वचन देतो.

यासोबतच, भाऊ आपल्या बहिणीला भेटवस्तू देतो. २०२५ मध्ये रक्षाबंधनाच्या दिवशी भावाने आपल्या बहिणीला तिच्या राशीनुसार काय भेटवस्तू द्यावी ते जाणून घेऊया, जे तिच्यासाठी फलदायी ठरेल



आणि यामुळे बहिणीला आनंद तर मिळेलच पण तिचे नशीबही बळकट होईल. रक्षाबंधनाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्व आहे. अनेक कथांनुसार, या दिवसाचे महत्व वाढले आहे. उदाहरणार्थ, द्रौपदीने कृष्णाला राखी बांधली आणि कृष्णाने तिचे रक्षण केले, अशी एक कथा आहे.

मेष झ लाल रंगाची पर्स किंवा बॅग भेट द्या. तुम्ही लाल गुलाबाचा परफ्यूम देखील भेट देऊ शकता.

वृषभ झ तुम्ही डिझायनर कपडे, परफ्यूम, चॉकलेट भेट देऊ शकता.

मिथुन झ राखीनिमित्त तुम्ही मिथुन राशीच्या बहिणींना पुस्तके, स्मार्ट गॅझेट्स किंवा स्टायलिश पेन भेट देऊ शकता.

कर्क झ कर्क राशीच्या लोकांना फोटो फ्रेम, चांदीचे दागिने आणि चांदीच्या बांगड्या भेट द्या.

सिंह झ सिंह राशीच्या लोकांना तुम्ही मेकअपच्या वस्तू, सोने आणि घड्याळे भेट देऊ शकता.

कन्या- कन्या राशीच्या लोकांसाठी हँडबॅग्ज, पर्स, त्वचेची काळजी.

तूळ राशी झ तूळ राशीच्या लोकांना तुम्ही फॅशन ज्वेलरी, परफ्यूम, सुंदर साडी किंवा दुपट्टा भेट देऊ शकता.

वृश्चिक झ वृश्चिक राशीच्या लोकांना सौंदर्यप्रसाधनांच्या वस्तू आणि रुद्राक्ष लॉकेट भेट म्हणून देता येतील.

धनु झ तुम्ही धनु राशीच्या लोकांना धार्मिक पुस्तके, वाचन पुस्तके, प्रवास पॅकेजेस भेट देऊ शकता.

मकर झ मकर राशीच्या लोकांना तुम्ही ऑफिस डायरी, पेन स्टँड, कपडे भेट देऊ शकता.

कुंभ झ कुंभ राशीच्या लोकांना तुम्ही टेक गॅझेट्स, मोबाईल फोन, स्मार्टवॉच, ज्योतिष पुस्तके भेट देऊ शकता.

मीन झ मीन राशीच्या लोकांना तुम्ही देवाची मूर्ती भेट देऊ शकता. तुम्ही एअरपॉड्स देखील भेट देऊ शकता.

आठवड्यातील भाग्यवान राशीः ४ ऑगस्टपासून सुरू होणारा नवीन आठवडा या ५ राशींच्या जीवनात उत्साह घेऊन येईल.

# भारतातच नव्हे या देशांतही करतात रक्षाबंधन; मुस्लिम बहुल देशांचाही समावेश

श्रावण महिन्यात रक्षाबंधन हा सण साजरा केला जातो. बहीण- भावाच्या अतूट नात्यासाठी हा सण महत्त्वाचा असतो. हिंदू धमार्तील हा एक प्रमुख सण आहे. या दिवशी बहीण आपल्या भावाचे औक्षण करून त्याला राखी बांधते. बहीण भावाच्या दीघार्युष्यासाठी त्याला राखी बांधते तर भाऊ बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देत असतो. मात्र तुम्हाला माहित आहे का? केवळ भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांत या सण अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो. ते देश कोणते आपण जाणून घेऊया...




**नेपाळ**

भारताप्रमाणेच नेपाळमध्येही हिंदू लोकसंख्या जास्त आहे. नेपाळमध्ये भारतासारख्याच सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा आहेत. इथे रक्षाबंधनला ह्नजनाई पौर्णिमाह्न म्हणून ओळखले जाते. या दिवशी पुरुष पवित्र धागा ज्याला जनाई म्हणतात तो बदलतात आणि महिला त्यांच्या भावांना राखी बांधतात. नेपाळमध्ये या सणाला धार्मिक महत्त्व देखील आहे. या दिवशी लोक नद्यांमध्ये स्नान करतात.

**मॉरिशस**

मॉरिशसमध्ये भारतीय लोकसंख्या सुमारे 70% आहे. मॉरिशस आणि भारताची संस्कृती मिळतीजुळती आहे. या देशात रक्षाबंधन हा कौटुंबिक आणि सामाजिक सण म्हणून साजरा केला जातो. बहिणी त्यांच्या भावांना राखी बांधतात आणि त्यांना मिठाई खाऊ घालतात. पुरुष त्यांच्या बहिणींचे रक्षण करण्याचे वचन देतात. मॉरिशसमध्ये, शाळा, कार्यालये आणि मंदिरांमध्ये यासारख्या सार्वजनिक ठिकाणी रक्षाबंधन अनेकदा साजरे केले जाते.

**फिजी**

फि जी म ध्ये भारतीय वंशाचे लोक मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. यापैकी बहुतेक लोक १९ व्या शतकात ऊसतोडणीसाठी येथे स्थायिक झाले होते. हे लोक फिजीमध्ये रक्षाबंधन मोठ्या थाटामाटात साजरे करतात. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणी पारंपारिक पद्धतीने आपल्या भावांना राखी बांधतात आणि उपवास देखील करतात.




**दक्षिण आफ्रिका**

दक्षिण आफ्रिकेत स्थायिक झालेल्या हिंदू समुदायात रक्षाबंधन हा एक महत्त्वाचा सण बनला आहे. मंदिरे आणि हिंदू संघटना एकत्रितपणे रक्षाबंधन साजरे करतात. या दिवशी महिला सख्ख्या भावांनासह इतर पुरुषांनाही राखी बांधतात. यामुळे समाजात सुसंवाद आणि बंधुत्वाची भावना निर्माण होते अशी मान्यता आहे.

**अमेरिका, ब्रिटन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया**

जगभरात असे अनेक देश आहेत जिथे रक्षाबंधन साजरे केले जाते. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियामध्ये हा सण साजरा केला जातो. या देशांमध्ये मोठ्या संख्येने भारतीय राहतात. रक्षाबंधनाच्या दिवशी, बहिणी पोस्ट किंवा ऑनलाइन साइट्सद्वारे राख्या पाठवतात. या ठिकाणी लोक जमेल तसे एकमेकांच्या घरी जाऊन हा सण साजरा करतात. अनेक शहरांमध्ये, हिंदू मंदिरे, भारतीय संघटना आणि शाळांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात.

# कर्जबाजारी टॅक्सीचालकांचा संताप! ओला, उबेर आणि रॅपिडो सारख्या ॲप्स विराधात आंदोलनाचा इशारा

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

ॲपआधारित रिक्षा व टॅक्सीचालकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्याऐवजी परदेशी खासगी संस्थांच्या माध्यमातून एक नवीन ॲप चालू करण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे. मात्र या निर्णयाविरोधात चालकांमध्ये संतापाची तीव्र लाट उमटली आहे. अनेक चालकांवर कजार्चा डोंगर आहे, त्यात ओला-उबरसारख्या कंपन्यांकडून आपल्यावर अन्याय होत असल्याची त्यांची तक्रार आहे. अशा परिस्थितीत या कंपन्यांवर अंकुश ठेवण्याबाबत सरकारकडून कोणतेही उपाय केले जात नसताना नव्या ॲपचा घाट घालण्यात येत आहे. त्यामुळे प्रलंबित मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा चालकांनी दिला आहे. ओला, उबेर, रॅपिडोसारख्या कंपन्या परदेशी गुंतवणुकीच्या माध्यमातून राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालवणाऱ्या युवकांचे आर्थिक शोषण करत आहेत, तसेच प्रवाशांचीही आर्थिक पिळवणूक होत आहे, अशी तक्रार करून या चालकांनी नुकतेच आंदोलन केले होते, मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर काही दिवसांसाठी आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र त्यानंतर राज्य सरकारने कंपन्यांवर वचक ठेवून चालकांना योग्य मोबदला देण्यासाठी सूचना देणे गरजेचे होते. प्रत्यक्षात सरकार ॲप तयार करत असून कंपन्यांसाठी अद्याप कोणतीही नियमावली लागू केलेली नाही. सुरुवातीला चांगला मोबदला



मिळत असल्याने मुंबईसह राज्यात चालकांनी कर्ज काढून वाहनांची खरेदी केली आहे.

अनेक कुटुंबीयांचा उदरनिवार्हाचा मुख्य आधार याच रिक्षा-टॅक्सींवर आहे. मात्र सरकारच्या निर्णयामुळे चालकांच्या समस्या 'जैसे थे' राहणार आहेत. ॲपआधारित रिक्षा, टॅक्सी, बसचालकांचे प्रश्न सरकारने प्रथमिकतेने सोडवणे गरजेचे होते. कंपन्यांवर लगाम ठेवणे गरजेचे असताना सरकार बाजारात स्पर्धेसाठी उतरत आहे. यात सरकारचा फायदा होणार आहे. मात्र चालकांच्या हिताचा निर्णय परिवहन विभाग घेणार की नाही, अशा प्रश्न हे चालक उपस्थित करत आहेत.

आंदोलनावर तोडगा काढण्याऐवजी त्या माध्यमातून खासगी संस्थांना मोबाइल ॲप्लिकेशन काढून देण्याचा परिवहन मंत्र्यांचा प्रयत्न दिसत आहे. त्यामुळे सर्वांत मोठे नुकसान चालकांचे होणार आहे. कंपन्या निरंकुश राहिल्याने चालक आणि प्रवाशांची लूट सुरूच राहणार आहे, अशी प्रतिक्रिया चालकांमधून उमटत आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या भूमिकेचा आम्ही जाहीर निषेध करत असून पुन्हा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र कामगार सभेचे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी दिला आहे.

शहरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी विविध उपाययोजनांवर विचार होत आहेत. मुंबै बँकेच्या माध्यमातून नवीन पाच हजार वाहने रस्त्यावर आणण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. शहरात विद्यमान धावत असलेल्या वाहनांना उभे करण्यासाठी जागा उपलब्ध नाही. अशातच नवी वाहने कुठे उभी करणार, त्यासाठी कोणतेही धोरण परिवहन विभागाकडे नाही. त्यामुळे वाहतूककोंडी आणि वाहनतळाचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे.

# कबुतरांना अन्नपाणी देण्याची बंदी कायम; मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

**■मुंबई। प्रतिनिधी:**

उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मुंबई महानगरपालिकेने दादर स्टेशनजवळील कबुतरखाना २ जुलै रोजी बंद केला होता. याप्रकरणी बुधवारी (६ ऑगस्ट) सकाळी जैन समाजातील लोकांना आंदोलन केले होते. मात्र शांततेत सुरू असलेल्या आंदोलनाने अचानक आक्रमक रुप धारण केले. आंदोलकांनी कबुतरखान्याला लावलेली ताडपत्री हटवली आणि तेथील बांबू काढून फेकले होते. यानंतर कबुतरखाना सुरू करण्यात आला होता. मात्र गुरुवारी (०७ ऑगस्ट) मुंबई उच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीवेळी कबुतरांना अन्नपाणी देण्याची बंदी कायम ठेवण्यात आली आहे. तसेच तसेच तज्ञ समिती स्थापन करून सखोल अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई उच्च



न्यायालयात सुनावणीला सुरुवात झाल्यानंतर डॉक्टरांचा अहवाल वाचून दाखवण्यात आला. त्यानंतर न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, कबुतरखाण्यासंदर्भात डॉक्टरांची समिती तयार करण्याबाबत चर्चा सुरू आहे. एनिमल वेलफियर असोशिएशनने आपले उत्तर न्यायालयात दिले आहे. कबुतरांना खायला घालण्याची नियमावली न्यायालयात सादर केली आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहेत. याशिवाय पुरातत्व विभागाचे अधिकारी विठ्ठल यादव यांचेही कबुतरखाना ऐतहासिक असल्याने म्हणणे आहे.

परंतु आम्ही डॉक्टरांच्या अहवालावर आधारित कबूतरखाने बंद करण्याचा निर्णय दिला होता, तरी याच्याविरोधात जाऊन सरकारला निर्णय घ्यायचा असेल तर सार्वजनिक आरोग्याच काय? तिथून हजारो लोक रोज प्रवास करतात त्यांच्या आरोग्यच काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, २०१८ चा डॉक्टराचा अहवाल आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, कबुतरांमुळे आजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो आणि श्वसनाचे आजार होतात. त्यामुळे कबुतर खाने रहिवाशी स्थानापासून काढले पाहिजेत. याचपार्श्वभूमीवर आम्हाला काही लोकांचा नाही तर सर्व लोकांचा विचार करायचा आहे. कारण सर्व सार्वजनिक जागांवरून नागरिकांची ये-जा होत असते. त्यामुळे आमचे म्हणणे आहे की, या प्रकरणात सरकार आणि महापालिका काय निर्णय घेतात, ते घेऊद्यात. कारणं हा त्यांचा विषय आहे. परंतु त्या जागांवरून हजारे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले ये-जा करत असतात. त्यामुळे आम्हाला समतोल राखायला हवा, असे मत न्यायमूर्तींनी मांडले. न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, राज्य शासनाचे कर्तव्य आहे की, तज्ज्ञांचीसमिती तयार करावी आणि त्यात डॉक्टरांचा समावेश असावा.

तुम्ही आणि आम्ही यामध्ये तज्ज्ञ नाही, त्यामुळे समितीचा अहवालाचा आपण सर्वांना मान्य करायला हवा. त्यात मुंबईतील सगळ्या महत्त्वाच्या रुग्णालयातील कोणत्या डॉक्टरांचा समावेश करायचा, याचा निर्णय सरकार घेईल, असे न्यायमूर्तींनी स्पष्ट केले. याचवेळी याचिकाकर्त्यांच्या बाजूने भूमिका वकिलाने सकाळी एक तास म्हणजेच 6 ते 7 वाजेपर्यंत आम्हाला कबुतरांना अन्नपानी देण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केली. यावर न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, पुरातन वास्तू विभागाचे विठ्ठल जाधव यांनी आपले स्वतंत्र प्रतिज्ञापत्र न्यायालयाला दिले आहे.

# एक वर्ष थांबा, मुंबई-गोवा महामागार्बाबत शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची मोठी घोषणा



**■पनवेल। प्रतिनिधी:**

१८ वर्षांपासून रेंगाळलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे अनेक मंत्र्यांनी दौरे केले, अनेक डेडलाईन दिल्या. मात्र, या महामार्गाने सगळ्यांचा विचका केला आहे. या पार्श्वभूमिवर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुंबई-गोवा महामार्गाचा गुरुवारी (७ ऑगस्ट) दौरा करत वर्षभरात सर्वकाही ठीक होईल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवाच्या प्रवासाकरिता तात्पुरती खड्डेदुरुस्ती केला जाईल, तरीही कोकणवासीयांना खड्ड्यांतून प्रवास करावा लागेल, हे स्पष्ट झाले आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम कधी पूर्ण होईल, हे आतापर्यंत कोणत्याही मंत्र्यांना ठामपणे सांगता आलेले नाही. त्यांनी दिलेल्या सर्व डेडलाईन रोडरोलरखाली चिरडल्या गेल्या आहेत. मात्र, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी कामाला वेग आणला असून त्यांनी कामाबाबत पारदर्शकता दाखवली आहे. आजमितीला ९० ते ९५ टक्के काम पूर्ण झाले असून काही महत्त्वाची कामे खोळंबल्याने एक वर्षात सर्व कामे पूर्ण होऊन १०० टक्के पूर्ण होतील, असा दावा मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले या दौऱ्यात केला आहे.

**...म्हणून कामे रेंगाळली - भोसले**

1. महामार्गाचे काम करणाऱ्या एजन्सी काही ठिकाणी चांगल्या नव्हत्या
2. जमिनी संपादनामुळे काही कामे अडली होती
3. नैसर्गिक अडचणींमुळे कामे लांबली होती
4. माणगाव, इंदापूरची टेंडरची कामे उशिराने झाली.

# मुंबईत 6 दिवसांच्या बाळाचा साडेपाच लाखांना सौदा; आईसह पाच जणांवर गुन्हा दाखल



**■मुंबई । प्रतिनिधी:**

गोवंडीच्या शिवाजीनगर परिसरात सहा दिवसांच्या बालकाचा साडेपाच लाखांना सौदा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. कायदेशीर दत्तक प्रक्रियेविना लहान मुलांची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी माग काढला असून दोन महिलांना याप्रकरणी ताब्यात घेतले आहे. बालकाची सुखरूप सुटका करण्यात आली. त्याच्या आईसह पाच जणांविरुद्ध शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाजीनगर परिसरात लहान मुलांची बेकायदा खरेदी-विक्री केली जात असल्याची माहिती एका सामाजिक कार्यकत्यार्ला मिळाली. त्याने ही माहिती समाजसेवा करणाऱ्या एका दाम्पत्याला दिली. त्यांनी समीर शेख या व्यक्तीला फोन करत लहान मूल हवे असल्याचे सांगितले. त्याने मुलगी हवी असल्यास चार लाख आणि मुलासाठी साडेपाच लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. या दाम्पत्याने मुलगा किंवा मुलगी कोणीही चालेल, असे सांगितल्यावर समीरने सहा दिवसांचे बाळ असल्याची माहिती दिली. याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी शिवाजीनगर पोलिसांना कळवले. बुधवारी, ६ ऑगस्ट रोजी नाझिमा अस्लम आणि फातिमा शेख या दोघी ठरलेल्या ठिकाणी बाळ घेऊन आल्या. त्याचवेळी पोलिसांच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे काही कागदपत्रे आढळली.

# दुसऱ्या लग्नाची आस महागात, न्यूयॉर्कच्या डॉक्टरचा मधाळ बोलून गंडा

**■मुंबई । प्रतिनिधी:**

विवाहित असूनही, लग्न जुळविणाऱ्या एका वेबसाइटवर नोंदणी करून दुसऱ्या पतीसाठी चालवलेली शोधमोहीम बोरिवली येथील वकील महिलेला चांगलीच महागात पडली. न्यूयॉर्क येथे डॉक्टर असल्याचे सांगत गाझा येथे नेमणुकीला असल्याचे भासवून या तरुणाने वकील महिलेला मधाळ बोलण्याने आपलेसे केले. भारतात भेटण्यासाठी येत असल्याचे निमित्त करून वेगवेगळी कारणे पुढे करत या दुसऱ्या वाग्दत्त पतीने तिच्याकडून तब्बल सहा लाख रुपये उकळले आहेत.




निखीला (बदललेले नाव) या वकील महिलेने बोरिवली पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदवली आहे. ही महिला पती आणि मुलासह वास्तव्यास आहे. तिने विवाह जुळविणाऱ्या एका वेबसाइटवर जुलै महिन्यात नोंदणी केली होती. तिचे प्रोफाइल पाहून मोहित गुप्ता या तरुणाने तिला 'रिक्वेस्ट' पाठवली.

निखीला हिने रिक्वेस्ट स्वीकारताच दोघांनी मोबाइल क्रमांकाची देवाणघेवाण केली. मोहित याने आपण न्यूयॉर्क येथे डॉक्टर असून अमेरिकी सरकारने सध्या गाझा येथे नेमणुक केली असल्याचे सांगितले. मोहित याने मधाळ बोलण्याने निखोला हिला आपलेसे केले. तिने त्याच्याकडे भेटण्याची इच्छा व्यक्त केली.

काही दिवसांनी मोहितने तिला एक ईमेल आयडी दिला. यावर त्याच्या सुट्टीसाठी परवानगी मागणारा अर्ज पाठव, असे तिला सांगितले. त्यानुसार तिने अर्ज तयार करून पाठवला. मंजुरी मिळाल्यानंतर गाझा येथे नेमणुकीला असल्याने मला आर्थिक व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे गाझा ते फिलिपाइन्स ते भारत असा प्रवास करण्यासाठी पैसे पाठव, मुंबईत आल्यावर देतो, असे मोहित याने सांगताच निखीला हिने दोन लाख रुपये पाठविले.

पैसे मिळताच त्याने विमानाचे तिकीट तिच्या मोबाइलवर पाठवले. त्यानंतर या विमानतळावर अडविले आहे, डॉलर खर्च करता येत नाहीत, अशी कारणे सांगून त्याने तिला सहा लाख रुपये पाठविण्यास भाग पाडले. क्लिअरन्स सर्टिफिकेटसाठी आणखी रक्कम पाठव, अशी मागणी होताच निखिलाने नकार दिला. मात्र त्यानंतर समोरून संपर्क बंद करण्यात आला.

# मुंबईच्या झवेरी बाजारातील तिघांविरुद्ध गुन्हा, प्रकरण काय?

**■मुंबई । प्रतिनिधी:**

सोन्याच्या व्यवसायात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळवून देतो, असे प्रलोभन दाखवून झवेरी बाजारातील तीन व्यापाऱ्यांनी अनेकांची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. गुंतवलेले ३६ किलो सोने आणि सुमारे १० कोटी रोख असा सुमारे ४४ कोटी रुपयांचा ऐवज या व्यापाऱ्यांनी डब्बा ट्रेडिंग मध्ये गुंतवला. मात्र, ही रक्कम



बुडाल्याने व्यवसायात तोटा झाल्याचे सांगत त्यांनी हात वर केले. या तीन व्यापाऱ्यांविरुद्ध लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, पश्चिम उपनगरात वास्तव्यास असलेल्या व्यापाऱ्याचे झवेरी बाजारात दुकान असून, त्याचा सोन्याचे दागिने खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. त्याची ओळख याच परिसरातील नावाजलेल्या मॅक्सिस बुलियन आणि पल्लव गोल्डच्या लादुलाल, पल्लव आणि शुभम यांच्यासोबत झाली. या तिघांनी आपल्याकडे व्यवसायाच्या वेगवेगळ्या योजना असून यामध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आश्वासन दिले. हे तिघे नावाजलेले असल्याने व्यापारी आणि त्यांच्या नातेवाइकांनी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि सुरुवातीला सुमारे दोन कोटी रुपये गुंतविले. या गुंतवणुकीवर चांगला मोबदला मिळाल्याने या व्यापाऱ्याचा तिघांवरील विश्वास अधिक दृढ झाला.

# लाडकी बहिन योजनेबाबत सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता

**■मुंबई । प्रतिनिधी:**


ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत मिळावी, या उद्देशानं सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. ही एक सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला दीज हजार रुपये जमा करण्यात येतात. मात्र आता सरकार या योजनेबाबत मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे, त्यामुळे रक्षाबंधनापूर्वीच लाडक्या बहिणींना मोठा धक्का बसू शकतो.



लाडकी बहीण योजना जेव्हा सुरू करण्यात आली होती, तेव्हा या योजनेसंदर्भात काही निकष तयार करण्यात आले होते. ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्याच कुटुंबातील महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला होता, तसेच ज्या महिलांचं वय 65 वर्षांपेक्षा जास्त आहे, अशा महिलांना या योजनेतून वगळण्यात आलं होतं. मात्र या निकषात न बरणाऱ्या देखील काही महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आलं आहे, ज्या महिलांचं वय हे 65 वर्षांपेक्षा जास्त आहे, अशा महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आलं आहे, तसेच ज्या महिलांकडे सरकारी नोकरी आहेत, त्यातील काही महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतला आहे. एवढंच काय तर चक्क 14 हजार पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, ही योजना फक्त महिलांसाठी असून देखील चुकीच्या पद्धतीनं या योजनेचा लाभ घेतला गेल्याचं समोर आलं आहे.

आता या संदर्भात मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार लाडकी बहीण योजनेत ज्यांनी फसवणूक केली त्यांच्यावर सरकार कारवाई करण्याच्या तयारीमध्ये आहे. लाडकी बहीण योजने अंतर्गत अनधिकृत लाभ घेतलेल्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. मिळत असलेल्या माहितीनुसार 15 दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडून खात्यांची माहिती मागवण्यात आली आहे, या मध्ये ज्या महिला दोषी आढळतील, त्यांच्याकडून संपूर्ण रक्कम वसूल केली जाण्याची शक्यता आहे, तसेच संबंधितांवर गुन्हे देखील दाखल केले जाऊ शकतात, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# मुंबईत पावसाची तुफान बॅटिंग, कोकणात रेड अलर्ट, पुढील 3 दिवस हवामान खात्याचा अंदाज काय?



**■मुंबई । प्रतिनिधी:**

गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा कोसळायला सुरुवात केली आहे. मुंबई आणि उपनगरांत आज पहाटेपासूनच मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे नागरिकांना थोडा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून असलेला उकाडा आणि दमट वातावरणाने त्रस्त झालेल्या मुंबईकरांना पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) आज मुंबईसह कोकणात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे.

सध्या मुंबईत मुसळधार पाऊस कोसळत आहे. गेल्या काही तासांपासून अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, विलेपार्ले, सांताक्रुझ आणि वांद्रे यांसारख्या पश्चिम उपनगरांत ढगाळ वातावरणासह जोरदार सरी कोसळत आहेत. या पावसामुळे मुंबईतील जनजीवनावर काहीसा परिणाम झाला आहे. रेल्वे वाहतूक थोडी विस्कळीत झाली असून, मध्य रेल्वेची वाहतूक सुमारे १५ मिनिटे उशिराने धावत आहे. तर हार्बर रेल्वेची वाहतूक १० मिनिटे उशिराने सुरू आहे. सुदैवाने, पश्चिम रेल्वेची वाहतूक सध्या तरी सुरळीत सुरू आहे.

मुंबई आणि उपनगरांतील हवामानाचा अंदाज

मुंबईतील विविध भागांत, विशेषतः दक्षिण मुंबईतील कुलाबा, मरिन ड्राइव्ह तसेच मध्य मुंबईतील दादर, सायन आणि पश्चिम उपनगरांमधील अंधेरी, विलेपार्ले या ठिकाणी आज पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज वर्तवला जात आहे. त्यासोबतच नवी मुंबई आणि ठाण्यातही मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. आज दिवसभर आकाश अंशतः ढगाळ राहील. मात्र दमट वातावरण कायम राहण्याचा अंदाज आहे. यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना छत्री किंवा रेनकोट सोबत ठेवावे, अशी सूचना हवामान विभागाने दिली आहे.

गेल्या आठवडाभरापासून कोकणातून गायब झालेल्या पावसाने आता पुन्हा जोर धरला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या भागात पुढील तीन दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पावसामुळे अनेक भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे, त्यामुळे स्थानिकांनी सतर्क राहावे. तसेच समुद्रकिनारी भागात वाऱ्याचा वेग जास्त असल्याने समुद्रही खवळलेला राहणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com